**प्रेस नोट दिनांक २६/०३/२०१९**

**गावठी कटटा व २ जिवंत काडतुसांसह येरवडा परिसरात फिरणाऱ्या एकास येरवडा पोलीसांकडुन अटक.**

लोकसभा निवडणुक – २०१९ च्या अनुषंगाने अवैध्य शस्त्र बाळगणाऱ्या तसेच इतर अवैध्य धंदे करणाऱ्यांबददल माहीती घेण्याकरीता येरवडा पोलीस स्टेशन तपास पथकातील पोलीस उप निरीक्षक मंगेश भांगे, पोहवा/संदीप मांजुळकर, अजय पाडोळे,समीर भोरडे असे येरवडा पोलीस स्टेशनचे हददीमध्ये पेट्रोलिंग करीत असताना त्यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, सुदामा भेळ, बदामी चौक,येरवडा येथे एक इसम त्याचे कंबरेला पिस्तुल सारखी दिसणारी वस्तु आहे. सदर बातमीच्या अनुषंगाने येरवडा पोलीस स्टेशन कडील तपास पथकाने सदर इसमास सापळा रचुन जागीच ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव पत्ता विचारला असता त्याने त्याचे नाव हैदर अली नबी शेख,वय – २५ वर्षे,रा.नागपुर चाळ,येरवडा पुणे असे सांगितले. त्याची दोन पंचासमक्ष झडती घेतली असता त्याचे कंबरेला एक गावठी कटटा व दोन जिवंत काडतुसे मिळुन आली आहेत.

सदर इसम नामे हैदर अली नबी शेख,वय – २५ वर्षे,रा.नागपुर चाळ,येरवडा पुणे. याचे येरवडा पोलीस स्टेशन गु.र.नं. २३५/२०१९ भा.द.वि.क.५(२५) महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर हत्यार हे आरोपीने कशासाठी आणले आहे. याबाबत अधिक तपास चालु आहे.

सदर कामगिरी मा.अप्पर पोलीस आयुक्त सो. पुर्व प्रादेशिक विभाग श्री.सुनिल फुलारी, पोलीस उप-आयुक्त परिमंडळ ४ पुणे श्री. प्रसाद आक्कानवरू सहा.पोलीस आयुक्त येरवडा विभाग डॉ. शिवाजी पवार, राजेंद्र कदम वरिष्ठ पोलीस निरीक्षक येरवडा स्टेशन पुणे, अजय वाघमारे पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक मंगेश भांगे, पोहवा/संदीप मांजुळकर, अजय पडोळे, समीर भोरडे, पंकज मुसळे, पो.हवा. हणमंत जाधव,सुनिल सकट यांनी केलेली आहे.

(राजेंद्र कदम)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
येरवडा पोलीस स्टेशन पुणे

Scanned by CamScanner